क्र. विउआ(प्रशिक्षण) /आस्था–१८ / प्रशिक्षण / GSTN प्रशिक्षण / ब–१२० मुंबई दि. १८/02/2017

विशेष विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय
तिसरा मजला, नवी इमारत,विक्रीकर भवन
माझगांव, मुंबई–४०० ०१०

*** प रि प त्र क ***

केंद्र शासनाच्या प्रशिक्षण धोरणानुसार GST चे प्रशिक्षण विभागातील सर्व स्तरावरील अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे माहे डिंसेबर २०१६ पर्यत पूर्ण झालेले आहे. पुढील टप्पात GSTN (Goods & Services Tax Network) चे प्रशिक्षण सर्व अधिकारी व कर्मचारी यांना बंधनकारक आहे. प्रशिक्षणासंबंधित कार्यक्रमांची व सूचनांची सविस्तर माहिति खालील प्रमाणे आहे.

1 GSTN करिताचे "Master Trainer" चे प्रशिक्षण दिनांक ०९/०२/२०१७ ते २५/०२/२०१७ या कालावधीत चेन्नई येथे संपन्न होणार आहे.

2 सदर प्रशिक्षणासाठी विभागनिहाय व जिल्हानिहाय "Master Trainer" ची नेमणूक करण्यात आलेली आहे.

3 प्रत्येक "Master Trainer करिता प्रशिक्षणाचा कालावधी तीन दिवसांचा असणार आहे.

4 "Master Trainer' प्रशिक्षित झाल्यावर सदर प्रशिक्षण विभागनिहाय / जिल्हानिहाय (मुंबई माझगांव / बांन्द्रा कार्यालय वगळता) आपल्या स्तरावर आयोजित करावयाचे आहे.

5 प्रशिक्षणाचा पुढचा टप्पा म्हणजे प्रशिक्षित झालेल्या प्रत्येक "Master Trainer मार्फत त्यांच्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना (Tax official) GSTN चे प्रशिक्षण देण्याचे नियोजित केलेले आहे.

6 (Tax official) प्रशिक्षणाचा कालावधी २ दिवसांचा असून हे प्रशिक्षण विक्रीकर सहआयुक्त ते कर सहायक / लिपिक पदापर्यत दयावयाचे आहे.

7 सदर प्रशिक्षण हे साधारण दिनांक १७/०४/२०१७ पासून सुरु करावे.

8 सदर प्रशिक्षणासाठी Computer Lab व Internet सुविधा आवश्यक आहे. तसेच प्रशिक्षक व प्रशिक्षण संबंधी वेळापत्रकांचे नियोजन आपल्या स्तरावर करावयाचे आहे.

9 Internet तसेच software व hardware मधील configuration संदर्भात www.gst.gov.in या site वरील system requirement नुसार configuration आवश्यक आहे.

10 प्रशिक्षणासाठी आपल्या स्तरावर प्रशिक्षणार्थीची संख्या व तुकडी (Batches) यांचे आपल्या सोयीनुसार नियोजन करावयाचे आहे.

11 प्रशिक्षणाकरिता आवश्यक असणाऱ्या संगणक कार्यशाळा (Computer Lab), अभ्यास साहित्य व इतर अनुषंगीक खर्च कार्यालयाने करावयाचे असून, त्यावर होणाऱ्या खर्याचे भुगदान आपल्याकडे उपलब्ध असलेल्या निधितून करावयाचे आहे अथवा प्रशिक्षण विभागाकडे उपलब्ध असलेल्या निधीतून करावयाचे आहे. त्याबाबतच्या सविस्तर सुचना आपणांस नंतर कळविण्यात येतील.

12 आपल्या स्तरावरील सर्वाचे प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **दिनांक २०/०६/२०१७ पर्यत विक्रीकर सहआयुक्त यांनी, मा. विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य** यांच्या कार्यालयात सादर करावे व त्याची एक प्रत विक्रीकर सहआयुक्त (प्रशिक्षण) विभाग, माझगांव, मुंबई येथे सादर करावी.

13 अधिक माहितीसाठी E-mail-trainingsectionmumbai@gmail.com, Phone No. 23760725/ 23760724/ 23760715/ 23760723/23760127, विक्रीकर सहआयुक्त (प्रशिक्षण)/विक्रीकर उपआयुक्त (प्रशिक्षण), विक्रीकर विभाग, माझंगाव, मुंबई, महाराष्ट्र राज्य या कार्यालयाशी संपर्क साधावा.

(मा. आयुक्त विक्रीकर विभाग, महाराष्ट्र राज्य, यांच्या मान्यतेने)

पराग जैन नानोटीया
विशेष विक्रीकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीस्तव सादर —

१) मा. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
२) मा. विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
३) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक तथा दक्षता अधिकारी,विक्रीकर विभाग,मुंबई याचे कार्यालय
४) सर्व अप्पर विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
५) सर्व विक्रीकर सहआयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई
६) सर्व आस्थापना अधिकारी, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई